E-9896862

मंत्रालयीन सेवा
जनहितार्थ सर्वदा

दूरध्वनी क्र. ०२२ २२८३ ०६२६
मेल आयडी- desk१.mdd-mh@gov.in
संकेतस्थळ : mdd.maharashtra.gov.in

**महाराष्ट्र शासन**
**अल्पसंख्यांक विकास विभाग**
दालन क्र. ५२८, मंत्रालय (विस्तार इमारत), मादाम
कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

---

क्रमांक : संकीर्ण-२०२५/प्र.क्र.६८/का.१ दिनांक : ०६ मार्च, २०२६

प्रति,
अप्पर मुख्य अधिकारी/प्रधान सचिव/सचिव
सर्व प्रशासकीय विभाग, मंत्रालय, मुंबई.

**विषय :** कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई
हे पद प्रतिनियुक्तीने भरण्याबाबत.

महोदय,

अल्पसंख्यांक विकास विभागाच्या अधिनस्त महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई या कार्यालयातील "कार्यकारी अधिकारी" हे पद प्रतिनियुक्तीने भरण्यात येणार आहे.

हज समिती अधिनियम, २००२ च्या खंड २१ मध्ये महाराष्ट्र राज्य हज समितीवर कार्यकारी अधिकारी पदाच्या नियुक्तीची तरतूद पुढीलप्रमाणे आहे (प्रत सोबत जोडली आहे):-

४) *The state Government shall appoint a person, from amongst its officers not below the rank of Deputy Secretary to be Executive officer of the state committee provided that* ***the person so appointed shall preferably be a Muslim.***

५) *The Executive Officer of the State Committee shall act as its Secretary.*

६) *The Executive Officer shall execute the decision of the State Committee and perform such other functions as may be prescribed.*

उपरोक्त तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य हज समिती, मुंबई या कार्यालयातील "कार्यकारी अधिकारी" हे पद उपसचिव किंवा त्यापेक्षा वरिष्ठ दर्जाच्या अधिका-यांमधून प्रतिनियुक्तीने भरावयाचे आहे. मंत्रालयीन विभागातील उपसचिव यांचा ७ व्या वेतन आयोगानुसार वेतनस्तर एस-२५ आहे. यास्तव आपल्या विभागाच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील सहसचिव/उपसचिव दर्जाच्या (वेतनस्तर एस-२५ किंवा त्यापेक्षा अधिक वेतनश्रेणी असणा-या) अधिका-यांच्या निदर्शनास आणून त्यांचेकडून इच्छुकता अर्ज मागविण्यात यावेत. प्राप्त झालेले अर्ज पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव एकत्रितपणे या विभागास अग्रेषित करावेत, ही विनंती.

(मनोज जाधव)
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत: १) सहसचिव, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) निवडनस्ती कार्यासन-१, अल्पसंख्यांक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.